**भारत निवडणूक आयोगाच्या निदेशानुसार नियुक्त मतदार नोंदणी अधिकारी (ERO) व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी (AERO) यांच्या मानधनाबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२६/प्र.क्र.४९/निवडणूक-२**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई- ४०० ०३२
दिनांक : ०६ ऑगस्ट, २०२६

**वाचा :-** भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्र.ECI/PN/२७९/२०२५, दि.०२/०८/२०२५ चे आदेश.

**प्रस्तावना :-**

भारत निवडणूक आयोगाच्या उक्त वाचा येथील दि.०२/०८/२०२५ च्या निदेशान्वये, मतदार नोंदणी अधिकारी (ERO) व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी (AERO) यांना वार्षिक अनुक्रमे रु.३०,०००/- व रु.२५,०००/- असे मानधन मंजूर करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

शुद्ध आणि अचूक मतदार याद्या या लोकशाहीचा भक्कम पाया असून मतदार यादी तयार करणे आणि तिचे पुनरावलोकन करणे, या प्रक्रियेत मतदार नोंदणी अधिकारी (ERO), सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी (AERO) हे अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत असतात. या योगदानाची दखल घेवून भारत निवडणूक आयोगाने मतदार यादी तयार करणे व पुनरावलोकन करणे तसेच निवडणूकीशी संबंधित कामात सहभागी असलेल्या सर्व मतदार नोंदणी अधिकारी (ERO) आणि सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी (AERO) यांना उक्तप्रमाणे मानधन मंजूर करण्याचा निर्णय घेतलेला आहे. सबब, राज्यात २८८ मतदार नोंदणी अधिकारी (ERO) तर १७६२ इतके सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी (AERO) नियमित कार्यरत आहेत.

याव्यतिरिक्त, सद्य:स्थितीत भारत निवडणूक आयोगाकडून राज्यात मतदार याद्यांचे विशेष सखोल पडताळणी (SIR-२०२६) हा महत्वाचा कार्यक्रम राबविण्यात येत असून भारत निवडणूक आयोगाने असाधारण राजपत्र दि.१८/०६/२०२६ च्या अधिसूचनेन्वये सदर कार्यक्रमाच्या कालावधीसाठी सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी (AERO) यांची नियमित कार्यरत अधिसूचित पदांव्यतिरीक्त ३५२७ इतकी अतिरिक्त पदे अधिसूचित केलेली आहेत. सबब, अशा सर्व मतदार नोंदणी अधिकारी (ERO) आणि सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी (AERO) यांना उक्तप्रमाणे मानधन मंजूर करण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

भारत निवडणूक आयोगाच्या निदेशानुसार, नियमित कार्यरत मतदार नोंदणी अधिकारी (ERO) व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी (AERO) यांना वार्षिक अनुक्रमे रु.३०,०००/- व रु.२५,०००/- इतके मानधन अदा करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. त्याचप्रमाणे राज्यात सुरु असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षणासाठी भारत निवडणूक आयोगाने सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी (AERO) यांची अतिरिक्त पदे अधिसूचित केली आहेत, अशा अतिरिक्त AEROs यांना सदर पदावरील कालावधीच्या मर्यादेत मानधन अनुज्ञेय राहील.

३. सदर मानधन दि. ०१ जुलै, २०२६ पासून लागू होईल. सदर बाबींवर होणारा खर्च २०१५-निवडणूका, १०३-मतदारांच्या याद्या तयार करणे व त्यांचे मुद्रण (००) (०१) मतदार याद्या तयार करणे व त्यांचे मुद्रण, १३ कार्यालयीन खर्च, संगणक संकेतांक २०१५००३२ या लेखाशीर्षाखाली खर्ची घालावा व संबंधित चालू आर्थीक वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र.४१७/२०२६/व्यय-४, दि.०९/०७/२०२६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८०६१२२०१०५६०७ आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIKRAM
VISHNU NIKAM

Digitally signed by VIKRAM VISHNU NIKAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=General Administration Dept,
2.5.4.20=4D634E2FA0834759B8F84AE1FFC6DC3F9EBB91E308959F332DC4E59E12215148, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=9EB70F4C28BFB91710D15B96D47B5726FE76A08D143EB22AC25A88A6935601BD, cn=VIKRAM VISHNU NIKAM
Date: 2026.08.06 12:20:58 +05'30'

**(विक्रम निकम)**
**अवर सचिव तथा उप मुख्य निवडणूक अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य**

**प्रत :-**

(१) विभागीय आयुक्त (सर्व)
(२) जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी (सर्व)
(३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई
(४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर
(५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
(६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
(७) सर्व जिल्हा कोषा अधिकारी
(८) वित्त विभाग, व्यय-४, मंत्रालय, मुंबई
(९) निवडनस्ती